**ठळक बातम्या**

- केंद्रीय निवडणूक आयोगाची मुंबईत राजकीय पक्ष आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक

- संसदेच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू विषयक समितीच्या अध्यक्षपदी सुनील तटकरे, तर ऊर्जा समितीच्या अध्यक्षपदी श्रीरंग बारणे यांची नियुक्ती

- पावसामुळे झालेल्या विविध घटनांमध्ये राज्यात कालपासून ३ जणांचा मृत्यू, ६ जण जखमी, काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट

- भारत-बांगलादेश कसोटी मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात पावसाचा व्यत्यय

**आणि**

- माजी मंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रोहिदास पाटील यांचं निधन

**<><><><><>**

राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोग मुंबईत विविध बैठक घेत आहे. यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्यासह निवडणूक आयुक्त आणि आयोगाचे इतर अधिकारी कालच मुंबईत दाखल झाले आहेत. त्यांनी आज सकाळी राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरच्या पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली. त्यानंतर राज्यातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी निवडणूक आयोगानं चर्चा केली. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह खात्याचे अतिरीक्त

मुख्य सचिव इक्बाल सिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

<><><><><>

संसदेच्या आर्थिक विषयक स्थायी समितीच्या अध्यक्षपदी भर्तृहरी महताब यांची तर परराष्ट्र व्यवहार विषयक समितीच्या अध्यक्षपदी शशी थरूर यांची नेमणूक झाली आहे. माजी केंद्रीय मंत्री राधा मोहन सिंग हे संरक्षण विषयक तर राधा मोहन दास अग्रवाल गृहविषयक समितीचे अध्यक्ष राहणार आहे. सुनील तटकरे यांची पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, श्रीरंग बारणे यांची ऊर्जा विषयक समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक झाली आहे. याशिवाय इतरही अनेक समित्यांच्या अध्यक्षांची नेमणूक झाली आहे.

<><><><><>

पुणे मेट्रोच्या मार्गाचं लोकार्पण आणि भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे येत्या रविवारी २९ सप्टेंबर रोजी होणार आहे. केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी ही माहिती दिली आहे. पावसामुळं काल होणारा हा कार्यक्रम पुढे ढकलला होता.

<><><><><>

विदर्भातल्या औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधा आणखी मजबूत करण्यासाठी ४०० कोटी रुपयांची तरतूद केली जाणार आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज नागपुरात ‘उद्यमात सकल समृद्धी, महाराष्ट्राची उद्योग भरारी’ कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात बोलताना ही माहिती दिली. मागच्या तीन महिन्यात एकट्या महाराष्ट्रात ७५ हजार कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक झाली असून, गुंतवणूकीचा हा प्रवाह असाच सुरू राहणार असल्याचं ते म्हणाले.

पुढच्या वर्षापर्यंत गडचिरोली जिल्ह्याची नक्षलग्रस्त जिल्हा ही ओळख पुसून, उद्योगनगरी ही ओळख निर्माण होईल, असा विश्वास सामंत यांनी व्यक्त केला. मोठ्या प्रकल्पातंर्गत गडचिरोली जिल्ह्यातली ३५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक ५० हजार कोटीपर्यंत जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यातल्या महिलांसाठी भूसंपादनाचे नियम शिथिल केले असून, उद्योगासाठी जमीन देताना महिला उद्योजकांना प्राधान्य दिलं जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्यात पर्यटनाला चालना देण्याच्या दृष्टीनं पर्यटन स्थळांवर तारांकित दर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यावर पर्यटन विभागाचा भर असल्याचं पर्यटनमंत्री गिरीश महाजन यांनी सांगितलं. जागतिक पर्यटन दिनानिमित्त काल राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या वेरुळ इथल्या राष्ट्रकूट पर्यटक निवासाचं उद्घाटन दूरस्थ पद्धतीनं करताना ते बोलत होते.

**<><><><><>**

पावसामुळे झालेल्या विविध घटनांमध्ये राज्यात गेल्या चोवीस तासात ३ जण मरण पावले असून ६ जण जखमी झाले आहेत. राज्यातल्या विविध धरणात ८८ टक्क्यांहून अधिक पाणीसाठा आहे. गेल्यावर्षी या कालावधीत हे प्रमाण सुमारे ७१ टक्के होतं.

**मुंबईच्या** अनेक भागांत आज सकाळी जोरदार पाऊस झाला. मुंबई आणि लगतच्या जिल्ह्यांसाठी आज ऑरेंज अलर्ट लागू असून विजांच्या कडकडाटासह अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. आज सकाळपर्यंत संपलेल्या चोवीस तासात मुंबईत ४३ मिलीमीटर तर उपनगरात ७३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. सखल भागात पाणी साचलं होतं.

हवामान विभागानं आज **उत्तर महाराष्ट्र, पालघर आणि रायगडला** ऑरेंज अलर्ट दिला आहे. याठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. **दक्षिण महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या** काही भागातही आज जोरदार पाऊस होऊ शकतो, असं हवामान विभागानं कळवलं आहे.

**नवी मुंबई** परिसरात आज सकाळपासून पावसाची संततधार सुरू आहे. यात काल नेरूळ मध्ये एक जुनं घर कोसळून तीन घरांचं नुकसान झालं

संततधार पावसामुळे नाशिक मधल्या धरणांमधला पाणीसाठा वाढला असून **गंगापूर** धरणासह १३ धरणांमधून पुन्हा पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे. या पावसामुळे ग्रामीण भागात घरांची पडझड झाली आहे.

**लातूरमध्ये** मांजरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पडलेल्या पावसामुळे मांजरा धरण हे १०० टक्के भरलं आहे. सध्या धरणातून मांजरा नदीपात्रात ३ हजार ४९४ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. तर **लातूर-धाराशिव** सीमेवरच्या तेरणा नदीपात्रातला विसर्ग कमी करण्यात आला असून सध्या २ हजार २९० क्यूसेक इतका सुरू आहे.

**<><><><><>**

भारत आणि बांगलादेश यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतला दुसरा सामन्याचा आजचा खेळ पावसामुळं थांबवण्यात आला. सकाळी कानपूरच्या ग्रीन पार्क स्टेडियमवर हा सामना सुरू झाला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. ३५ षटकात बांग्लादेशानं संघ ३ गडी बाद १०७ धावा केल्या होत्या. या मालिकेतला पहिला सामना जिंकून भारत मालिकेत १-० ने आघाडीवर आहे.

**<><><><><>**

मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारतीय जोडीनं महिला दुहेरीच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. या जोडीनं सु यिन हुई आणि वु लुओ या तैवानी जोडीचा २१-१२, २१-१७ असा सरळ गेममधे पराभव केला. या दोघीही उद्या उपांत्य सामन्यात सिह पेई शान आणि हंग एन झु या दुसऱ्या एका तैवानी जोडीशी लढत देतील.

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री रोहिदास पाटील यांचं आज पहाटे धुळे इथं वार्धक्यानं निधन झालं. ते ८४ वर्षांचे होते. राज्य सरकारमध्ये ते पाटबंधारे खात्याचे मंत्री होते. आमदार कुणाल पाटील यांचे ते वडील होते. त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी सुंदर सावित्री सभागृहात ठेवण्यात येणार आहे. उद्या सकाळी ११ वाजता अंत्ययात्रा सुरु होईल आणि SSVPS महाविद्यालयाच्या मैदानावर अंत्यसंस्कार होतील असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

मॅकेनिकल शाखेत बी.ई. झालेल्या रोहिदास पाटील यांनी सन १९७२ मध्ये धुळे जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून पहिल्यांदा निवडून येत राजकारणात प्रवेश केला. त्यानंतर १९८० मध्ये तत्कालीन कुसुंबा आणि आताच्या धुळे ग्रामीण विधान सभा मतदारसंघात आमदार म्हणून ते निवडून आले आणि त्यानंतर सलग ६ वेळा त्यांनी या मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केलं. १९८६ ते १९८८ या कालावधीत ते महसूल राज्यमंत्री होते. त्यानंतर त्यांनी कृषी आणि फलोत्पादन मंत्री, ग्रामविकास, पाटबंधारे तसंच रोजगार हमी, गृहनिर्माण, संसदीय कार्य अशा विविध खात्यांचं मंत्रीपद भूषवलं. रोहिदास पाटील यांच्या कारकिर्दीत धुळे जिल्ह्यातले अक्कलपाडा आणि इतर प्रकल्प पूर्ण झाले. याखेरीज काँग्रेस पक्षात तसंच अनेक सामाजिक संस्था संघटनांमधे त्यांनी विविध पदांच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या.रोहीदास पाटील यांच्या

निधनाबद्दल ज्येष्ठ नेते शरद पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खासदार वर्षा गायकवाड इत्यादी मान्यवरांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

'स्वच्छता ही सेवा' अभियान सध्या देशभरात राबवलं जात आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ तालुक्यातले रहिवासी रितेश साळगावकर यांनी याबाबत माहिती दिली...

**होल्ड बाईट.**

**<><><><><>**

'एक पेड मा के नाम' अभियानाअंतर्गत देशात ८० कोटी झाडांची लागवड झाली आहे. पर्यावरण मंत्रालयानं २५ सप्टेंबरला हे लक्ष्य साध्य केलं. उत्तर प्रदेशात सर्वाधिक २६ कोटी झाडांची लागवड झाली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात राज्यातल्या सर्व शाळांमधून परसबाग उपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी घेण्यात आलेल्या परसबाग स्पर्धेत गडचिरोली जिल्ह्याच्या मुलचेरा तालुक्यातल्या उदयनगर बांग्ला जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परसबागेला राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे. येत्या रविवारी पुण्यात राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतर्फे आयोजित कार्यक्रमात शाळेला सन्मानित करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आमदार राजन पाटील यांची नियुक्ती झाली आहे. राज्य शासनानं त्यांना राज्यमंत्रीपदाचा दर्जा दिला आहे.

सहकार विभागानं याबाबतचा शासन निर्णय आज जारी केला. आजपासून तीन वर्ष, किंवा पुढचा आदेश येईपर्यंत राजन पाटील या पदावर राहतील, असं शासन निर्णयात म्हटलं आहे.

**<><><><><>**

येत्या २९ सप्टेंबर रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशविदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११४ वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, आकाशवाणी वृत्त संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एआयआर या ॲपवर प्रसारित केला जाईल.

**//<><><><><>//**